MHRT080004552021

# नियमित दिवाणी दावा क्रमांक ३०/२०२१ मधील निशाणी क्र. ११८ खालील आदेश

१. प्रतिवादी क्र. १ ने सदरचा अर्ज वादीचा नि. ११५ या अर्जावरील म्हणणे दाखल न करता आल्यामुळे मा. न्यायालयाने पारीत केलेला विनाम्हणणे आदेश रद्द बातल करण्याकरीता केलेला आहे. सदरच्या अर्जाअन्वये प्रतिवादी क्र. १ कथन करतात की, आजारपणामुळे ते मागील तारखेला दि. ०३/०५/२०२३ रोजी न्यायालयात हजर राहू शकले नाहीत. प्रतिवादीना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी न दिल्यास त्याचे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब विनाम्हणणे आदेश रद्दबातल करण्यात यावा, अशी त्यांनी विनंती केली.

२. वादींनी नि. ११८ वर म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, सदरचा अर्ज खोटा आणि खोडसाळ आहे. केवळ वेळ काढण्याचा हा प्रयत्न आहे. वैदयकीय प्रमाणपत्र अभिलेखावर दाखल न केल्यामुळे आजारपणाचे कारण खोटे आहे. सबब अर्ज नामंजूर करावा व प्रतिवादी क्र. १ ला जास्तीत जास्त दंडाची रक्कम लादण्यात यावी.

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2023.07.26 17:26:49 +0530

३. अर्ज पाहिला. अर्जावरील म्हणणे पाहिले. दोन्ही वकीलांचा युक्तीवाद ऐकला. नि. ११५ येथील अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम ११ सह कलम १५१ अन्वये दाखल केलेला आहे. या अर्जाअन्वये वादींनी दि. ०७/०७/२०२२ रोजी नि. ६ वर माझ्या विदवान पूर्वाधिका-यांनी पारीत केलेल्या निर्देशाची अवहेलना व अवमान केला आहे. सबब न्यायालयाचा आदेश जाणूनबुजुन भंग केल्यामुळे प्रतिवादीचा बचाव रद्द करण्यात यावा व प्रतिवादी क्र. १ ने दावा मिळकत अनु. क्र. ३ ची मिळकत गट नं ५६/०४ च्या हद्दीवर मुख्य रस्त्यालगत वादीच्या जाण्यायेण्याच्या पायवाटेवर बेकायदेशीरपणे लावलेल्या लोखंडी गेटचे कुलुप बेलिफामार्फत अगर योग्य त्या अधिका-यामार्फत त्वरीत काढण्याचे

आदेश व्हावेत अशी मागणी केली आहे. अर्जाचे स्वरुप पाहता प्रतिवादी क्र. १ यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी न दिल्यास दाव्यात गुंतागुंत वाढून प्रकरण किष्ट होवू शकते. याउलट प्रतिवादी क्र. १ यांनी केलेल्या विलंबासाठी त्यांना योग्य ती खर्चाची रक्कम देण्याच्या अटीवर म्हणणे मांडण्याची संधी दिल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. निश्चीतच दोन्ही पक्षकारांचे म्हणणे अभिलेखावर आल्यास अर्ज निर्णयान्वीत लावण्यास मदतच होईल. सबब प्रतिवादी क्र. १ यांचा अर्ज नि. ११८ मंजूर होण्यास पात्र आहे. झालेल्या विलंबासाठी प्रतिवादी क्र. १ यांनी वादीला रक्कम रु. २००/- देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब मी पुढील आदेश पारीत करते.

## आदेश

१. अर्ज नि. ११८ मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१ यांनी वादीना आजच्या अथवा पुढील तारखेस रक्कम रुपये २००/- देणेच्या अटीवर प्रतिवादी क्र.१ विरुध्द झालेला विनाम्हणणेचा आदेश रद्द करणेत येतो.

३. प्रतिवादी क्र. १ यांनी खर्चाची रक्कम दिल्यानंतर त्याचे म्हणणे वाचून दाखल करण्यात यावे.

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2023.07.26 17:26:58 +0530

(श्रुती ह. पाटील)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर
देवरुख

दि. २६/०७/२०२३

**CERTIFICATE**

order in R.C.S. No.30-2021Exh.118

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | T. N. Khade (Jr. Clerk) |
| Court name | : | Jt. Civil Judge, J. D. and J.M.F.C., Deorukh. |
| Date | : | 26/07/2023 |
| Order signed by the presiding officer on | : | 26/07/2023 |
| Order uploaded on | : | 26/07/2023 |